दैनिक रजि. नं. /२०२६

दाखल तारीख /०३/२०२६

Exh. 1/C

स. क्रि. केस नं. /२०२६

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल

## यांचे कोर्टात

श्री. नामदेव आनंदराव पाटील
व.व. ५५, व्यवसाय– वैदकीय व्यवसाय,
रा. वरदान हॉस्पिटल, नदी किनारा सिध्दनेर्ली,
ता. कागल, जि. कोल्हापूर
} फिर्यादी

विरूध्द

श्री. सचिन मनोहर चव्हाण
व.व. ४०, व्यवसाय– शेती,
रा. गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर
} आरोपी

<u>भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ प्रमाणे फिर्याद</u>
<u>कागल पोलिस स्टेशन</u>

Order
Put up for Verification
JMFC, Kagal

यातील फिर्यादी तर्फे विनंती अर्ज असा कि,

१) यातील फिर्यादी हे व्यवसायाने डॉक्टर असून त्यांचे वरदान हॉस्पिटल या नावाने नदीकिनारा सिध्दनेर्ली, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे हॉस्पिटल असून ते तेथील कायमचे रहिवाशी आहेत. फिर्यादी व आरोपीचे पाच वर्षापासून मित्र असून फिर्यादी यांनी आरोपीला चांगल्या प्रकारे ओळखतात. मैत्रीच्या संबंधामुळे फिर्यादी व आरोपीचे एकमेकांच्या घरी जाणे येणे असते. आरोपीचा रियल इस्टेट खरेदी विक्री व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी फिर्यादी यांनी वेळोवेळी मैत्री खातर पैशाची मदत केलेली आहे. त्याप्रमाणे व्यवसायासाठी व प्रापंचिक अडचणीसाठी रक्कमेची आवश्यकता आहे असे फिर्यादी यांना सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीस दि. १२/०१/२०२४ इ.रोजी आपली अडचणी दुर करणेकरिता रोख रक्कम रू. ११,००,०००/— (अक्षरी रक्कम रू. अकरा लाख फक्त) रोख दिले. मैत्रीचे संबंध असल्यामुळे रक्कम पोहाचलेबाबत वेगळी पोहोच पावती घेण्यात आलेली नाही.

२) सदर रक्कम देत असलेवेळी डॉ. मुकुंद बाळासाहेब चौगले रा. दारवाड, जि. कोल्हापूर व रोहित जयसिंग कुंभार रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेसमोर साक्षीने रोख रक्कम रू. ११,००,०००/— (अक्षरी रक्कम रू. अकरा लाख फक्त) अदा केलेली आहे.

३) फिर्यादी यांचेकडून स्विकारलेली रक्कम आरोपी यांनी दोन महिन्याच्या आत देणेची अटीवर देण्यात आलेली असे आरोपीकडून कबुल करून तोंडी हमी घेवून दिलेली आहे. तसेच फिर्यादी यांना वरील दोन महिने मुदतीत रक्कम विनातक्रार उपलब्ध होणार असलेली खात्री दिलेनंतर सदरची रक्कम अदा केलेली आहे.

३) दोन महिन्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीकडे सदर रक्कम मागणी केली असता आरोपी फिर्यादी यांचेकडून हातउसने आर्थिक अडचण व व्यवसायासाठी घेतलेली रक्कम आज देतो, उदया देतो, आठ दिवसांनी देतो अशी चालढकल केली अशी चालढकल आरोपीकडून जवळपास अकरा महिने इतके झालेली आहे. फिर्यादी यांनी खूपच तगादा लावला असता फिर्यादी यांचेकडून हातउसने घेतलेल्या रक्कमेच्या कायदेशीर परतफेडीसाठी फिर्यादी यांना आरोपी यांनी आरोपीचे खाते असले बॅकेचा पहिला चेक बॅक ऑफ इंडिया, चेक नं. १३००४३ शाखा गारगोटी या बॅकेचा रक्कम रू. ६,००,०००/— (अक्षरी सहा लाख फक्त) व दुसरा चेक नं. १३००४० या बॅकेचा रक्कम रू. ५,००,०००/— (अक्षरी पाच लाख फक्त) इतक्या रक्कमेचे चेकवरील रक्कम लिहून दिली व त्यानंतर सदर दोन्ही चेकवरील नांव लिहिणेस फिर्यादी यांना सांगितले व सदर चेकवरील मजकुराची शहानिशा करून सदर चेकवर आरोपी यांनी फिर्यादी व डॉ. मुकूंद बाळासाहेब चौगले व रोहित जयसिंग कुंभार यांचे समक्ष सही करून दिला व सदर चेक वटून फिर्यादी यांना फिर्यादी यांनी दिलेली कायदेशीर रक्कम परत

मिळणार यांची खात्री व हमी दिली. सदर चेक नमुद तारखेवर बॅंकेत जमा करणे विषयी विनंती केली.

४) फिर्यादी यांनी आरोपी यांच्या विनंतीनुसार चेक वटणेकरिता आपले खाते असलेल्या सदरचे दोन्ही चेक हे श्री वीरशैव बॅंक शाखा– कागल जि. कोल्हापूर या बॅंकेत दि. ०६/०१/२०२६ इ. रोजी भरले असता सदरचे दोन्ही चेक ''फड्स इनसफिशिएंट' या शे–यासहीत न वटता दि. ०६/०१/२०२६ इ.रोजी परत आले.

५) त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी यांना दिनांक २८/०१/२०२६ इ. रोजी फिर्यादी यांचे वकील ॲड. जान्हवी नामदेव पाटील यांचेकरवी लेखी नोटीस रजिस्टर्ड पोस्टाने त्यांचे पत्यावर पाठवून सदरचे चेक न वटलेबाबत कळवून आरोपी यांचेकडून नोटीस मिळालेपासून १५ दिवसांचे आत सदर न वटलेल्या चेकच्या रक्कमेची मागणी केली.

६) सदरची नोटीस आरोपी यांचे अचुक पत्यावरती गेली असता सदरची नोटीस ही दि.३०/०१/२०२६ इ.रोजी स्विकारली असून तशी पोहोच पावती फिर्यादी यांचे वकीलांचेकडे परत आली आहे. सबब, कायदयाच्या प्रस्थापित तत्वानुसार सदरची नोटीस आरोपी यास दि. ३०/०१/२०२६ इ. रोजी लागू झाली.

७) तथापि, आरोपी यांनी त्यानंतर म्हणजेच त्यांना नोटीस मिळालेपासून १५ (पंधरा) दिवसांत म्हणजेच दिनांक १४/०२/२०२६ इ. रोजीपर्यंत अथवा त्यानंतर आजतागायत

आरोपी यांनी फिर्यादी यांना सदरच्या धनादेशाची रक्कम आदा केलेली नाही. अशारितीने आरोपी यांनी फिर्यादी यांचे कायदेशिर देणे फिर्यादी यांना आदा करणेकरीता दिलेले चेक न वटता परत आलेनंतर सदरच्या चेक रक्कमेची मागणी करणारी नोटीस मिळून देखिल त्यानंतर १५ दिवसांत फिर्यादी यांना सदरच्या चेकची रक्कम आदा केली नाही. यावरुन आरोपीने दि निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे गुन्हयाचे कृत्य केले आहे.

८) फिर्यादीस कारण –

आरोपीने फिर्यादी यांना दिलेला कायदेशीर देणेपोटी दिलेले धनादेश बॅकेत भरणा केले नंतर सदर धनादेश दि.०६/०१/२०२६ इ. रोजी न वटता परत आला त्यानंतर ३० दिवसांत फिर्यादी यांनी त्याचे वकील यांचेमार्फत दि. २८/०१/२०२६ इ.रोजी लेखी नोटीस पाठवून चेक रक्कमेची मागणी केली. सदरची नोटीस दि. ३०/०१/२०२६ इ. रोजी लागू झाली. कायदयातील तरतुदीनुसार आरोपी यांनी दि.१४/०२/२०२६ इ.रोजीपर्यंत फिर्यादीची धनादेशाची रक्कम न भागविलेने फिर्यादीस सदर फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

९) अधिकारक्षेत्र – सदरचा चेक फिर्यादी याने त्याचे खाते असलेल्या बॅक श्री वीरशैव बॅक शाखा कागल, जि. कोल्हापूर येथे भरला त्यामुळे फिर्यादी मधील नमुद गुन्हा हा मे. न्यायालयाचे स्थलसिमेत घडलेला आहे. त्यामुळे मे. कोर्टाना सदर फिर्यादीची चौकशी करणेचा व निकाल देणेचा अधिकार आहे.

१०) सबब, फिर्यादी यांची नम्र विनंती की,

अ) आरोपीने फिर्यादी कायदेशीर देणे लागत असतानाही आपल्या खात्यावर चेकच्या रक्कमेएवढी रक्कम शिल्लक नाही याची पुर्ण कल्पना असतानाही चेक नक्की वटेल याची खोटी हमी व खात्री फिर्यादी देवून आरोपीने फिर्यादी जाणुन बुजून, हेतुपुरस्पर घोर फसवणुक करून गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे, त्यामुळे आरोपीस दि निगो.इ. ॲक्ट कलम १३८ अन्वये जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी.

ब) सदर आरोपीस चेकचे दुप्पट रक्कमेचा दंड करण्यात येवून सदरची रक्कम नुकसानी दाखल भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम ३९५ (३) व नि. इ. ॲक्ट १८८१ चे कलम ११७ (क) अन्वये फिर्यादी यांना देवविण्यात यावी.

क) न्यायाचे अन्य हुकूम फिर्यादी यांना मंजूर व्हावे.

ड) जरूर तर जादा लेखी अथवा तोंडी पुरावा करणेची संधी असावी.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

कागल

दि. 13 / ०३ / २०२६

(फिर्यादी)
नामदेव आनंदराव पा

यांसी पुरावा—

अ) लेखी पुरावा—

१. आरोपी यांनी फिर्यादी यांना दिलेले चेक्स

२. बॅंकेचा रिटर्न मेमो

३. फिर्यादी यांनी आरोपीस पाठविलेली नोटीसीची स्थळप्रत

४. रजि. ए.डी. केल्याची पोष्टाची पावती.

५. सदर नोटीसीचा पोष्टाची पोहोच पावती

ब. तोंडी पुरावा —

१. फिर्यादी स्वतः

२. डॉ. मुकुंद बाळासाहेब चौगले रा. दारवाड, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

३. रोहित जयसिंग कुंभार रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

४. बॅंक ऑफ इंडिया शाखा गारगोटी तर्फे संबंधित इसम

५. श्री विरशैव बॅंक शाखा कागल बॅंके तर्फे संबंधित अधिकारी

६. संबधित पोस्टमन

जरूर तर जादा लेखी पुरावा देणेस परवानगी असावी.

कागल — मे. जा. व्हावे

दि. १९/०३/२०२६

(फिर्यादी)

नामदेव आनंदराव पाटील

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.02 17:39:50 +0530